# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.७/२०२३** **दिनांक १२/०४/२०२३**
**स्थळ- जिल्हा न्यायालय, अहमदनगर** **वेळ- सकाळी ११.०० वा.**

मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील जनहित याचिका नं.९८/२०२१ व (सिव्हील ॲप्लीकेशन नं.११९७३/२०२१) यावर दि.१३/०९/२०२२ रोजी मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीकरीता नियुक्त केलेल्या तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा बुधवार दि.१२/०४/२०२३ रोजी दुपारी ०३.०० वा. जिल्हा न्यायालय, अहमदनगर येथे आयोजित करणेत आली असलेबाबत जा.नं.स्वीस/४५/२०२३, जिल्हा न्यायालय, अहमदनगर, दि.१० एप्रिल,२०२३ अन्वये सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आलेले होते.

त्यानुसार मा.तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा बुधवार दि.१२/०४/२०२३ रोजी दुपारी ०३.०० ऐवजी सकाळी ११.०० वा. जिल्हा न्यायालय,अहमदनगर येथे मा.श्री.सुधाकर यार्लगड्डा, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

**या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.**

**मा.श्री.सुधाकर यार्लगड्डा,**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा**
**अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

**मा.श्री. सिध्दाराम सालीमठ, भा.प्र.से.**
**जिल्हाधिकारी, अहमदनगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

**मा.श्री.राहूल जाधव,**
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी तथा**
**प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

---

विषय नं.१ दि.२२.०३.२०२३ रोजी शिर्डी येथे झालेल्या तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

निर्णय क्र.२७१ विषय नं.१ ते १० चे निर्णय कायम करण्यात आले.
विषय नं.११ चा निर्णय कायम करण्यात आला. प्रगती अहवाल सादर करावा.
विषय नं.१२ चा निर्णय कायम करण्यात आला.
विषय नं.१३ चा निर्णय कायम करण्यात आला.
विषय नं.१४ ते १७ चे निर्णय कायम करण्यात आले.
विषय नं. १८ दुरुस्तीबाबतचा विषय आजचे सभेत असल्याने कायम करण्यात आला.
विषय नं.१९ ते ३० चे निर्णय कायम करण्यात आले.
विषय नं.३१- चक्रिय पध्दतीने मान्यता दिलेली आहे. निर्णय कायम करण्यात आला.
विषय नं.३२ ते ३६ चे निर्णय कायम करण्यात आले.
विषय नं.३७ निर्णय कायम करण्यात आला. माहिती येणे बाकी आहे.
विषय नं.३८ ते ४० चे निर्णय कायम करण्यात आले.
विषय नं.४१ चा निर्णय कायम करण्यात आला. पुढील सादरीकरण बाकी आहे.
विषय नं.४२ ते ४३ चे निर्णय कायम करण्यात आले.
विषय नं.४४ चा निर्णय कायम करण्यात आला. प्रस्ताव पुन्हा सादर करणे बाकी आहे.
विषय नं.४५ ते ५१ चे निर्णय कायम करण्यात आले.
विषय नं.५२ वाटाघाटी करुन कार्यादेश दिल्याचे प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी माहिती दिली म्हणून निर्णय कायम करण्यात आला.
विषय नं.५३ चा निर्णय कायम करण्यात आला.
आयत्या वेळेचा विषय नं.२ ते ४ चे निर्णय कायम करण्यात आले.
आयत्या वेळेचा विषय नं.५ चा निर्णय, निवेदन प्राप्त झाल्यामुळे पुर्नचर्चेस घेण्यात आला.
आयत्या वेळेचा विषय नं.६ ते १४ चे निर्णय कायम करण्यात आले.

(कार्यवाही-सभाकामकाज विभाग)

---

विषय नं.२ चक्रिय पध्दतीने मान्यता दिलेले विषय वाचुन कायम करणे.

१. सन २०२३-२०२४ करीता बारा महिन्याचे कालावधीसाठी पाणी पुरवठा विभागास पाणी शुध्दीकरणासाठी आवश्यक ब्लीचींग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदी करणेस व त्यासाठी येणारे खर्चास मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.२७२/१ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.

(कार्यवाही-पाणी पुरवठा विभाग)

---

२. श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता सन २०२३-२४ या वर्षाकरीता लागणारे औषधे व सर्जिकल साहित्याचे दर निश्चिती करणे (Rate Contract) तसेच On Consignment Basis वरील Material खरेदीकामी येणा-या अंदाजित एकुण रक्कम रु.३७,८६,२४,५५७/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.२७२/२ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.
(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

३. मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.२२.०३.२०२३ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्तातील दुरुस्तीबाबत.

निर्णय क्र.२७२/३ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.
(कार्यवाही-सभाकामकाज विभाग)

---

४. स्विस चॅलेंज पध्दतीने खरेदी केलेले शुध्द तुपाचे झालेले खर्चास मा.उच्च न्यायालयाची कार्योत्तर मान्यता घेणेबाबत.

निर्णय क्र.२७२/४ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.
(कार्यवाही-खरेदी विभाग)

---

५. सन २०२३-२४ करीता गाईचे शुध्द तुप खरेदीबाबत.

निर्णय क्र.२७२/५ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.
(कार्यवाही-खरेदी विभाग)

---

६. मे.गोदावरी खोरे ना.प.पा.ता.सह.दूध उत्पादक संघ, कोपरगाव व श्री स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगाव यांची टोन्ड गाय दुध दरामध्ये दरवाढ मिळणेचे मागणीबाबत.

निर्णय क्र.२७२/६ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.
(कार्यवाही-खरेदी विभाग)

---

विषय नं.३ संस्थानचे मंजूर आकृतीबंधातील कंत्राटी पदांवर ११ महिन्यांकरीता कंत्राटी पध्दतीने नेमणूक करण्यात आलेल्या कंत्राटी कर्मचा-यांना सेवा रजा विनियम-२०१३ नुसार रजा, सुट्टया लागू करणेबाबत.

**निर्णय क्र.२७३ संस्थानचे मंजूर आकृतीबंधातील कंत्राटी पदांवर ११ महिन्यांकरीता कंत्राटी पध्दतीने नेमणूक करण्यात आलेल्या कंत्राटी कर्मचा-यांना महाराष्ट्र दुकाने व व्यापारी संस्था (नोकरीचे नियम व सेवाशर्तीच्या अटी) कायदा २०१७ च्या धर्तीवर ११ महिने सेवेचा कालावधी विचारात घेऊन सात किरकोळ रजा, सतरा अर्जित रजा व शॉप ॲक्ट नुसार लागु असणा-या सात सार्वजनिक सुटटया (मात्र सार्वजनिक सुटीच्या दिवशी सदर सुटी न घेता दोन महिन्याचे आत सदरची बदली सुटी घेण्यात यावी या अटीवर) लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.४ संस्थान कंत्राटी कामगारांना संस्थान सेवेत नियमित नेमणूका देणेबाबत.**

**निर्णय क्र.२७४ सदर विषयावर प्रदिर्घ चर्चा झाली. दि.१.४.२००६ रोजी झालेल्या सभेतील निर्णय क्र.२२५ नुसार त्यात उल्लेख केल्याप्रमाणे ३१.१२.२००० पर्यंत कार्यरत कर्मचा-यांना नियमित वेतनश्रेणीत समाविष्ट करुन घेतांना तेव्हा उपलब्ध रिक्त पदांचे आधारे तो निर्णय घेतला किंवा कसे याबाबत खुलासा सादर करावा. सदरील निर्णयात शेवटी सन २००० नंतर घेतलेल्या कंत्राटी कर्मचा-यांना संस्थान सेवेत कामावर घेणेबाबत निर्णय घ्यावा म्हणून नमुद केल्यामुळे तत्कालीन व्यवस्थापन समितीने दि.१९.११.२०११ रोजी निर्णय क्र.७६५ (२३) चा मंजूर करुन शासनाकडे प्रस्ताव पाठविला होता. नंतर १७.०९.२०१९ चा शासन निर्णय प्राप्त झाला झाला तसेच रिट पिटीशन क्र.६२२४/२०२० निर्णय दि.०३.०७.२०२१ निर्णय प्राप्त झाला. शासन निर्णय दि.१७.०९.२०१९ आणि शासन निर्णय दि.०७.०८.२००९ अनुसार सेवा प्रवेश नियमावलीची शासनाकडून अद्याप मंजुरी अप्राप्त आहे. परंतु सदर ५९८ कर्मचारी सन २००४ मध्ये अधिनियम लागू होण्यापुर्वीपासून कार्यरत होते. म्हणून त्यांना व्यवस्थापन समितीकडून मंजूरी घेऊन आवश्यक पात्रता परिक्षा घेऊन त्यापैकी पात्र कर्मचा-यांना नियमित वेतनश्रेणी पदावर घेता येईल, असे समितीचे मत आहे. त्यात जे पात्रतेचे निकष पुर्ण करणार नाहीत त्यांना एकत्रित मानधन लागु राहील.**

**वरील खुलाशासह सविस्तर प्रस्ताव सादर करण्यात यावा. सी ए दाखल करुन शासनाकडे पाठविण्याची आवश्यकता राहील.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.५ श्री.सुनिल गंगाधर आरणे, संस्थान कंत्राटी अकुशल कर्मचारी (५९८) यांचे दि.२१.०२.२०२२, दि.१७.०९.२०२२ व दि.१२.१२.२०२२ रोजीचे संस्थान निवासस्थान मिळणेबाबतचे विनंती अर्ज.**

**निर्णय क्र.२७५** **Rights of Persons with Disabilities Act-2016 मधील तरतुदीनुसार फेर प्रस्ताव सादर करावा.** **(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.६** **मे.सी.आय.एस.एस.सर्व्हिसेस, मुंबई या लेबर ठेकेदाराकडील कर्मचारी श्री.मच्छिंद्र सुरेश वदक, कंत्राटी कर्मचारी, पाणी पुरवठा विभाग यांचेबाबत.**

**निर्णय क्र.२७६** **सदर प्रस्तावाबाबत प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निर्णय घ्यावा.**
**(कार्यवाही-कामगार विभाग)**

---

**विषय नं.७** **श्री साई मंदिरात हार, फुले, गुच्छ व प्रसाद सुरु करणेबाबतचे प्रस्तावावर विचार विनियम होऊन निर्णय होणेबाबत.**

**निर्णय क्र.२७७** **तत्कालीन जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील समितीने सादर केलेल्या अहवालात संस्थान कर्मचा-यांच्या पतसंस्थेमार्फत शेतक-यांकडून फुलांची खरेदी करुन मंदिराचे प्रांगणात भाविकांना रास्त दरात उपलब्ध करुन देता येईल अशी शिफारस केलेली आहे. त्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मंदिर सुरक्षा विषयक सर्व बाबींचा विचार करुन कार्यवाही करावी व मा.जिल्हाधिकारी यांनी त्यांचे अहवालात दिलेल्या सर्व मुद्दयांचे काटेकोरपणे पालन करावे असा निर्णय घेण्यात आला.**

**दोन ते तीन महिन्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आढावा घेऊन अहवाल समितीसमोर सादर करावा.** **(कार्यवाही-संरक्षण विभाग)**

---

**विषय नं.८** **माहे जुन-२०२२ ते ऑगस्ट-२०२२ चे जमा खर्चाची नोंद घेणेस्तव फेरसादर.**

**निर्णय क्र.२७८** **तहकुब.** **(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**विषय नं.९** **माहे सप्टेंबर-२०२२ ते नोव्हेंबर-२०२२ जमा खर्चाची नोंद घेणेबाबत.**

**निर्णय क्र.२७९** **तहकुब.** **(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**विषय नं.१०** **माहे डिसेंबर-२०२२ जमा खर्चाची नोंद घेणेबाबत.**

**निर्णय क्र.२८०** **तहकुब.** **(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**विषय नं.११** **माहे जानेवारी-२०२३ जमा खर्चाची नोंद घेणेबाबत.**

**निर्णय क्र.२८१ तहकुब. (कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**विषय नं.१२ माहे फेब्रुवारी-२०२३ जमाखर्चाची नोंद घेणे/कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२८२ तहकुब. (कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**विषय नं.१३ सन २०२३-२४ करीता कॅश काऊटींग मशिन्स दुरुस्ती देखभाल करणेसाठी वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (AMC) कामासाठी प्राप्त दरपत्रकांतील न्युनतम दरधारकास पुरवठा आदेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.२८३ प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**विषय नं.१४ युनियन बँक ऑफ इंडिया, शाखा पाचेगाव ता.नेवासा येथे संस्थानचे नावाने बचत खाते उघडून त्यांचेकडून संस्थानला बँक विषयक सेवा घेणेबाबत.**

**निर्णय क्र.२८४ संस्थानकडे जमा होणारी सुटी नाणी स्विकारणेबाबत तसेच इतर जास्तीत जास्त चांगल्या सेवा उपलब्ध करुन देणेबाबत जिल्हातील सर्व राष्ट्रीयकृत बँकाना संस्थानचे नावाने बचत खाते उघडणेसाठी अवाहन करुन त्यांचेकडून प्रस्ताव मागविणेत यावेत. (कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**विषय नं.१५ कॅनरा बँक, शाखा- औरंगाबाद येथे संस्थानचे नावाने बचत खाते उघडणे व त्यांचेकडून संस्थानला बँक विषयक सेवा घेणेबाबत.**

**निर्णय क्र.२८५ संस्थानकडे जमा होणारी सुटी नाणी स्विकारणेबाबत तसेच इतर जास्तीत जास्त चांगल्या सेवा उपलब्ध करुन देणेबाबत जिल्हातील सर्व राष्ट्रीयकृत बँकाना संस्थानचे नावाने बचत खाते उघडणेसाठी अवाहन करुन त्यांचेकडून प्रस्ताव मागविणेत यावेत. (कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**विषय नं.१६ श्री साईनाथ रुग्णालय परिसरातील जनरेटर रुमचे मागील पडलेल्या व पश्चिमेकडील कंम्पाऊंड भिंतीचे नव्याने बांधकाम करणे कामासाठी प्राप्त झालेल्या ई-निविदेतील निम्नतम दराचे निविदाधारका समवेत चर्चा वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत.**

**निर्णय क्र.२८६ श्री साईनाथ रुग्णालय परिसरातील जनरेटर रुमचे मागील पडलेल्या व पश्चिमेकडील कंम्पाऊंड भिंतीचे नव्याने बांधकाम करणे कामासाठी प्राप्त झालेल्या ई-निविदेतील**

निम्नतम दराचे निविदाधारक यांचे समवेत चर्चा वाटाघाटी करुन कार्यादेश देण्याचे अधिकार प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात आले.

(कार्यवाही-बांधकाम विभाग)

---

विषय नं.१७ संस्थानचे मुंबई येथील साई निकेतन इमारतीच्या कौलारु छताचे नुतनीकरण व आऊट हाऊसचे छताचे वॉटरप्रुफींग करणेबाबत.

निर्णय क्र.२८७ तहकुब. (कार्यवाही-बांधकाम विभाग)

---

विषय नं.१८ मौजे निमगाव को-हाळे येथील गट नं.१८३ पै.मध्ये श्री साईबाबा शैक्षणिक संकुल प्रकल्पाचे बांधकाम करणे कामाचे ठेकेदार मे.न्याती इंजिनिअर्स ॲण्ड कंन्सल्टंट प्रा.लि.पुणे यांचे अंतिम बिल, निविदेपेक्षा जादा झालेले काम, वाढीव क्षेत्रफळ तसेच भाववाढ मागणीबाबत.

निर्णय क्र.२८८ तहकुब. (कार्यवाही-बांधकाम विभाग)

---

विषय नं.१९ साईगार्डन प्रकल्पातंर्गत उभारणेत येणा-या लेजर शो प्रकल्पाचे ठेकेदार मे.लेजर व्हिजन लि.हॉगकॉग यांचे समवेत आर्बिट्रेशन करणे अथवा पुन्हा प्रकल्प सुरु करणे या विषयी कायदेशीर सल्ला घेऊन त्याप्रमाणे कार्यवाही करणेसाठी सॉलिसीटर यांची नेमणूक करणेबाबत.

निर्णय क्र.२८९ तहकुब. (कार्यवाही-बांधकाम विभाग)

---

विषय नं.२० वाढीव शिर्डी संस्थान संयुक्त पाणी पुरवठा योजना तयार करणेचे शुल्क रक्कम रुपये ६०.०० लक्ष महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागास अदा करणे तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यात टप्पा क्र.१ चे कामाचा करारनामा करणेस मान्यता मिळणेकरीता तसेच योजनेच्या सद्यस्थितीबाबत संयुक्त पाणी अहवाल मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेसमोर सादर करणेबाबत.

निर्णय क्र.२९० अधिक्षक अभियंता,जीवन प्राधिकरण व त्यांचे अधिकारी यांचेशी चर्चा केली. प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सादर केलेला प्रस्ताव विचारात घेतला. प्रस्ताव मंजूर. जीवन प्राधिकरण यांची कंन्स्लंटन्सी फी देण्यास मान्यता देण्यात आली. सी.ए.दाखल करावा.

परिच्छेद क्र.३ मधील उल्लेखीत रक्कम किती होते याबाबत जीवन प्राधिकरण व शिर्डी संस्थानचे कार्यकारी अभियंता यांनी संयुक्त पाहणी करुन प्रस्ताव सादर करावा. (कार्यवाही-पाणी पुरवठा विभाग/विधी विभाग)

---

**विषय नं.२१** मा.अध्यक्ष साहेब यांचे दि.०८.०३.२०२३ रोजीचे श्रींचे अलंकार, आभुषणे, मौल्यवान वस्तु हाताळणीबाबतचे पत्राबाबत.

**निर्णय क्र.२९१** श्रींचे अलंकार, आभुषणे, मौल्यवान वस्तु हाताळणीबाबत व्यवस्था केल्याचे मंदिर विभागाचे प्र.प्रमुख श्री.रमेश चौधरी यांनी समितीसमोर सांगीतले.

(कार्यवाही-मंदिर विभाग)

---

**विषय नं.२२** श्री साईबाबा पुण्यतिथी (दसरा) उत्सवाचे वेळी निमंत्रण यादीमध्ये नांवे समाविष्ट करणेबाबत.

**निर्णय क्र.२९२** तहकुब. (कार्यवाही-मंदिर विभाग)

---

**विषय नं.२३** श्री साईबाबा हॉस्पिटल व परिसरातील सर्व इमारतीमध्ये स्थायी अग्निशमन यंत्रणा प्रस्थापित करणेबाबत.

**निर्णय क्र.२९३** प्रस्ताव मंजूर. सी.ए.दाखल करावा.

(कार्यवाही-फायर ॲन्ड सेफ्टी विभाग/विधी विभाग)

---

**विषय नं.२४** श्री साईनाथ रुग्णालय व परिसरातील सर्व इमारतीमध्ये स्थायी अग्निशमन यंत्रणा प्रस्थापित करणेबाबत.

**निर्णय क्र.२९४** प्रस्ताव मंजूर. सी.ए.दाखल करावा.

(कार्यवाही-फायर ॲन्ड सेफ्टी विभाग/विधी विभाग)

---

**विषय नं.२५** शैक्षणिक वर्ष २०२३-२४ या वर्षाकरीता शालेय व स्कुलबस शुल्कात १० टक्के फी वाढीबाबत.

**निर्णय क्र.२९५** प्रस्ताव मंजूर.

(कार्यवाही-श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल)

---

**विषय नं.२६** संस्थान प्रकाशित विविध प्रकारची २१ पुस्तके पुर्नमुद्रण/छपाई करुन पुरवठा करणेकामी मागविणेत आलेल्या ई-निविदेमधील प्राप्त न्युनतम दरधारकांना कार्यादेश देणेबाबत.

**निर्णय क्र.२९६** प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही-प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.२७** दर्शन रांगेत मोफत लाडू प्रसाद पाकीटांऐवजी पुर्वीप्रमाणेच मोफत बुंदी प्रसाद वाटप सुरु करणेस मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.२९७** प्रस्ताव मंजूर. सी.ए.दाखल करावा.
(कार्यवाही- लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग/विधी विभाग)

---

**विषय नं.२८** सन २०२३-२४ करीता मोतीचुर लाडू, सुटी बुंदी व बर्फी प्रसाद तयार व पॅकींग करुन घेणे इ.कामांची ई-निविदा प्रक्रीया राबविणेबाबत.

**निर्णय क्र.२९८** सदरचे प्रस्तावात माहिती अपुर्ण आहे. प्रशासकीय अधिकारी यांचेशी चर्चा झाली. सन २०२३-२४ साठी लाडू निर्मिती पॅकींग या संदर्भातील ई-निविदा प्रक्रिया तात्काळ राबवावी. सध्याचे लाडू ठेकेदार यांना ३० जुन पर्यंत मुदतवाढ दिली असल्याचे प्रशासकीय अधिकारी यांनी सांगीतले. त्यांचेकडून विहीत कालावधीपर्यंत लाडू निर्मिती प्रक्रिया चालू ठेवावी. मुदतवाढ कालावधीसाठी लागणारा लाडू निर्मीतीसाठीचा अंदाजे मजुरी खर्च रक्कम रु.३६,००,०००/- सन २०२२-२३ मधील मंजुर अंदाजपत्रकातील शिल्लक रकमेतुन करण्यात यावा.
(कार्यवाही-लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग)

---

**विषय नं.२९** मंदिर परिसरात शुभोभिकरण करणेकामी विविध प्रकारचे आकर्षक फिरते (Portable) कारंजे बसविणेकामी सादरीकरण (Presentation) करणेबाबत.

**निर्णय क्र.२९९** तहकुब. (कार्यवाही-बगीचा विभाग)

---

**विषय नं.३०** दिनांक २२ मार्च, २०२३ रोजीचे मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेतील निर्णय क्र.२२१ मध्ये बदल करणेबाबत.

**निर्णय क्र. ३००** श्री साईबाबा शैक्षणिक संकुल (नवीन) या ठिकाणी ८ नग रोलींग शटर्स बसविणे आहे, असे सभेला सांगण्यात आले. तसा बदल करुन श्री साईबाबा शैक्षणिक संकुल (नवीन), औद्योगिक प्रशिक्षण संस्था व प्रसादालय या ठिकाणी एकुण ११ नग नवीन

रोलींग शटर्स तयार करुन बसविणेकामी दरपत्रके बोलविणेस मान्यता देण्यात आली. प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)

---

विषय नं.३१ गणवेश पुरवठादार मे.चंपालाल ॲन्ड कंपनी, नाशिक यांचे दि.०९.०२.२०२३ रोजीचे पत्राने गणवेश पुरवठा सुरु करणेसाठी परवानगी मिळणेचे पत्राबाबत.

निर्णय क्र. ३०१ तहकुब. (कार्यवाही-खरेदी विभाग)

---

विषय नं.३२ सन २०२३-२४ मधील दि.०१/०५/२०२३ ते दि.३१/०३/२०२४ अखेर कालावधीसाठी व्दारावती भक्तनिवास विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग / स्वच्छता कामाचा आऊटसोर्स पध्दतीने निम्नतम दरधारकाकडून करुन घेणेकामी निम्नतम दरधारकास मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर चर्चा वाटाघाटी करुन कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र. ३०२ तहकुब. (कार्यवाही- व्दारावती भक्तनिवास)

---

विषय नं.३३ श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता Medical Oxygen, Nitrus, Carbon dioxide गॅस खरेदी करणेबाबत.

निर्णय क्र. ३०३ तहकुब. (कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

विषय नं.३४ श्री साईबाबा हॉस्पिटल परिसरामध्ये ५ वर्ष कालावधीसाठी भाडेतत्वावर औषध दुकान भाडे तत्वावर चालविणेस देणेकामी अधिकत्तम दरधारकाशी चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय होणेबाबत.

निर्णय क्र. ३०४ अधिकत्तम दरधारक चर्चेसाठी समक्ष उपस्थित होते, त्यांचे ऐकले. प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

विषय नं.३५ श्री साईबाबा हॉस्पिटलचे मंजूर उपचार दरातील व संस्थानचे दोन्ही रुग्णालयातील तज्ञ डॉक्टरांना कामाच्या प्रमाणात देण्यात येणा-या प्रोत्साहन भत्त्यामध्ये सुधारणा करणेबाबत.

निर्णय क्र.३०५ तहकुब. (कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)

---

यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा करण्यात आली.

आयत्या वेळेचा

विषय नं.१ श्री.रायभान भाऊसाहेब डांगे, सेवानिलंबीत कर्मचारी, पाणी पुरवठा विभाग यांचा सेवानिलंबन रद्द करुन पुर्ववत पुर्वपदावर हजर करुन घेणेबाबतचा दि.३१.०३.२०२३ रोजीचा अर्ज.

निर्णय क्र.३०६ श्री.रायभान भाऊसाहेब डांगे, सेवानिलंबीत कर्मचारी, पाणी पुरवठा विभाग यांचे विभागीय चौकशीचे निर्णयास अधिन राहून त्यांचे सेवानिलंबन रद्द करुन पुर्ववत पुर्वपदावर हजर करुन घेणेबाबत निर्णय घेण्यात आला.

(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

--------------------------------------------------------------------------------------------------------

आयत्या वेळेचा

विषय नं.२ श्री. अभिजीत देविदास शिंदे यांना त्यांचे ऐतिहासिक वस्तु, शस्त्रास्त्रे व कलादालन व प्रदर्शन मांडण्यासाठी संस्थानचे साई प्रसादालय इमारतीतील जागेचा लिव्ह अॅन्ड लायसन्स तत्वावर वापरावयास दिलेल्या हॉल वापराचे मुदतवाढ व भाडेबाबत.

निर्णय क्र.३०७ श्री. अभिजीत देविदास शिंदे यांनी समितीस निवेदन दिले. समितीने त्यांचे म्हणणे ऐकुण घेतले.

श्री.शिंदे यांनी वाढीव दराने भाडे भरले त्या काळातील त्यांचे उत्पन्नाचा तपशिल मागविण्यात यावा.

श्री. अभिजीत देविदास शिंदे यांना त्यांचे ऐतिहासिक वस्तु, शस्त्रास्त्रे व कलादालन व प्रदर्शन मांडण्यासाठी संस्थानचे साई प्रसादालय इमारतीतील जागेचे २०२१, २०२२ व २०२३ चे व्यावसायीक व नियमीत दर सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडून मागविण्यात येऊन प्रस्ताव सादर करावा.

(कार्यवाही-मालमत्ता विभाग)

--------------------------------------------------------------------------------------------------------

आयत्या वेळेचा

विषय नं.३ श्री साईबाबा समाधी मंदिर विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे सुरक्षेकरीता महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ कडील सुरक्षा घेणेबाबत.

निर्णय क्र.३०८ प्रस्ताव सर्वानुमते मान्य. सी.ए.दाखल करावा.

(कार्यवाही-संरक्षण विभाग/विधी विभाग)

--------------------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४** **पीआयएल नं.१५/२०२० मध्ये सीआयएसएफ सुरक्षा घेणेकामी अहवाल सादर करणेबाबत.**

**निर्णय क्र.३०९** **उपरोक्त विषय समितीसमोर ठेवुन मा.सदस्यांसमवेत चर्चा केल्यानंतर एमएसएससीएफ नेमण्याबाबत दि.१३.१२.२०२२ रोजी मा.उच्च न्यायालयाने आदेश देऊन त्याचा पाठपुरावा करुन अहवाल सादर करणेबाबत आदेश दिला व ज्या अर्थी अध्यक्ष यांनी प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सदर आदेश कार्यान्वीत करणेबाबत कळविले आहे. त्याअर्थी एमएसएससीएफ ची नेमणूक करुन त्यांच्या सुरक्षेविषयक कामकाजाचा आढावा घेऊन एसआरपीएफ/सीआयएसएफ ची आवश्यकता आहे का हे निश्चीत करता येईल, असे सर्वानुमते ठरले. तसा अहवाल मा.उच्च न्यायालयाला पाठविता येईल.**

**(कार्यवाही-संरक्षण विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.५** **संस्थानचे मौजे निमगाव-को-हाळे गट नं.१९५ मधील हेलीपॅड येथील वेटींग लाऊंजचे नुतनीकरण करणे आणि हेलीपॅड व वेटींग लाऊंजचे मधील भागात पेव्हींग ब्लॉक बसविणे तसेच हेलिपॅडला चेनलींक जाळीचे कम्पाऊंड करणेकामी येणारे रु.३७,६७,५००/- मात्रचे अंदाजपत्रकीय खर्चास व सदर कामासाठी ई-निविदा मागविणेस मान्यता देणे.**

**निर्णय क्र.३१०** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.६** **श्री साईबाबा संस्थानचे दोन्ही हॉस्पिटलमध्ये नव्याने संगणकीकरण करणेकामी नवीन अत्याधुनिक संगणके, लॅपटॉप, यु.पी.एस. व प्रिंटर्स इ. साहित्य खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजीत खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३११** **प्रस्ताव मंजूर. सी.ए.दाखल करावा.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल/विधी विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.७** **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरिता आरएमओ/सीएमओ या रिक्त पदांकरिता संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन, मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांना नेमणूक आदेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.३१२ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.८ NEET व JEE चे क्लासेस सुरु करणेबाबत.**

**निर्णय क्र.३१३ प्रस्ताव मंजूर. सी.ए.दाखल करावा.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा महाविद्यालय/विधी विभाग/मालमत्ता विभाग)**

---

**वरील निर्णय क्र.२७१ ते ३१३ सर्वानुमते घेण्यात आले.**

**यानंतर सायं. ५.०० वा. सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.**

स्वाक्षरीत/-

**(राहूल जाधव)**
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी तथा**
**प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत/-

**(सिध्दाराम सालीमठ,भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी, अहमदनगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc)समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत/-

**(सुधाकर यार्लगड्डा)**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगरतथा**
**अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**